ePaper


## कोणत्याही परिस्थितीत भाजपला साथ नाही!: शरद पवार



| वर्ष - 7 | अंक - 98 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


**आतील पानांत**


- भारताचा इंडीजवर विजय
- या इंडस्ट्रीची मी शेवटची मुघल!
- राहुल गांधींची भारत जोडो यात्रा
- जालना जिल्ह्यात बसचा अपघात


www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 9 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# खड्डेमुक्तीसाठी 'स्पेशल टास्क फोर्स'!

## » महापालिका प्रशासनाची तयारी: क्षेत्रीय कार्यालयनिहाय पथक नियुक्ती

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आठ क्षेत्रिय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रामधील रस्त्यांवरील खड्डे दुरूस्तीसाठी विशेष पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये १ वाहन, २ मजूर आणि दुरूस्तीकामी आवश्यक असणाऱ्या बांधकाम साहित्याचा समावेश आहे. सदर विशेष पथके पावसाळ्याच्या कालावधीमध्ये आठवड्यातील सर्व दिवस तैनात ठेवण्यात येणार आहेत, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिली आहे.**



चिखली सोनवणे वस्ती रस्ता, तळवडे रूपीनगर मुख्य रस्ता, टॉवर लाईन रस्ता, चिखलीगाव रस्ता, चिखली मोरेवस्ती येथे वाघु साने चौक ते चिंचेचा मळा रस्ता, मुकाई चौक ते किवळे गावात जाणारा रस्ता तसेच पुनावळे अंडरपास ते गायकवाड नगर आणि कोयते वस्ती येथील रस्त्यावरील बुजविलेल्या खड्डयांची पाहणी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केली.

पाहणी दरम्यान रस्त्यांवर आढळलेले विविध ठिकाणचे खड्डे तातडीने दुरूस्त करण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या, तसेच पावसाळ्यानंतर रस्त्याचे खड्डे डांबराने किंवा कोल्डमिक्स पध्दतीने भरून घ्यावेत असे निर्देशही दिले. यावेळी सह शहर अभियंता ज्ञानदेव जुंधारे, कार्यकारी अभियंता अनिल शिंदे, देवान्ना गट्टूवार, उप अभियंता शालीग्राम अंदुरे उपस्थित होते.

> "महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये खड्डे बुजविण्याचे काम विशेष पथकांकडून सुरू आहे. नागरिकांकडून तक्रार मिळताच खड्डे बुजविण्याचे काम तात्काळ पुर्ण केले जाईल.
>
> **-ज्ञानदेव जुंधारे, सह शहर अभियंता.**

# शैक्षणिक कार्यानुभवासाठी पीसीसीओईच्या विद्यार्थ्यांचा यशस्वी जपान दौरा

## » हिरोशिमा, शिमाने या शहरातील शैक्षणिक, व्यावसायिक संस्थांना भेटी, प्रगत तंत्रज्ञानाची घेतली माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मागच्या काही दिवसांपासून नाराज असलेल्या रविकांत तुपकर यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेने अल्टिमेटम दिला आहे. 15 ऑगस्टपर्यंत रविकांत तुपकर यांनी आपली बाजू मांडावी, अशा सुचना स्वाभिमानी संघटनेने रविकांत तुपकर यांना दिल्या आहेत. आज पुण्यात स्वाभिमानीच्या बैठकीनंतर राजू शेट्टी आणि संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेतली यावेळी ते बोलत होते.**



पी. जी. ते पीएचडी दर्जेदार आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक अत्याधुनिक से सुविधा पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) वतीने उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. पीसीईटीच्या आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या (पीसीसीओई) विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कार्यानुभव उपक्रम अंतर्गत पंधरा दिवसांचा जपान दौरा यशस्वीपणे पूर्ण केला. यामध्ये टोकियो, हिरोशिमा, शिमाने या शहरातील शैक्षणिक, व्यावसायिक संस्थांना भेटी देऊन प्रगत तंत्रज्ञानाची माहिती घेतली. पीसीसीओईच्या आंतरराष्ट्रीय संबंध विभागाच्या अधिष्ठाता डॉ. अनुराधा ठाकरे, प्रा. गीतांजली झांबरे यांच्या नेतृत्वाखाली १६ सदस्यांनी जपानला भेट दिली. जपानसारख्या तांत्रिकदृष्ट्या प्रगत राष्ट्राने विज्ञान-तंत्रज्ञानात केलेली प्रगती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देण्याच्या उद्देशाने या कार्यानुभव सहलीचे आयोजन करण्यात आले. या अनुभवाने विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन अधिक विस्तृत होण्यासाठी मदत होईल. विद्यार्थ्यांना जपानी वातावरणात काम करण्याची, जपानी उद्योगातील तज्ज्ञ आणि आघाडीच्या संशोधकांशी संवाद साधण्याची संधी मिळाली.

# नाट्य परिषदेने एकत्रित काम करावे

## » कल्याणराव जाधव सभागृह व अभ्यासिकेचे उद्घाटन




। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शंभर वर्षांहून अधिक काळ कार्यरत असणाऱ्या महाराष्ट्र साहित्य परिषद आणि अखिल भारतीय नाट्य परिषद या दोन्ही संस्था एकाच दिशेने जाणाऱ्या असल्याने येणाऱ्या काळात मिळून काम करणे गरजेचे आहे, असे मत अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष आणि प्रख्यात अभिनेते प्रशांत दामले यांनी व्यक्त केले.**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कै. कल्याणराव जाधव सभागृह आणि अभ्यासिकेचे उदघाटन दामले यांच्या हस्ते झाले, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित उपस्थित होते. ज्यांच्या देणगीतून हे सभागृह आणि अभ्यासिका साकारली ते दुबईस्थित उद्योजक विनोद जाधव यांची विशेष उपस्थिती होती. साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, कोषाध्यक्ष सुनीताराजे पवार, उपाध्यक्ष राजीव बर्वे, कार्यवाह ॲड. प्रमोद आडकर उपस्थित होते.

दामले म्हणाले, वेगवेगळ्या विचाराच्या लोकांना सोबत घेऊन चालणे हे किती आव्हानात्मक आहे हे नाट्य परिषदेचे अध्यक्षपद सांभाळताना लक्षात येते आहे. साहित्य परिषद ११८ वर्षे सातत्याने कार्यरत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाची आम्हाला खूप गरज आहे. डॉ. राजा दीक्षित म्हणाले, पैसा कमावणारे अनेक, पण दानत असणारे फार कमी असतात. विनोद जाधव यांची दानशूरता विलक्षण आहे. साहित्य परिषद हे महाराष्ट्रातील साहित्य प्रबोधनाचे फलित आहे. विनोद जाधव म्हणाले, साहित्य हा व्यवहारातील भाषेचा दागिना असतो. व्यवहारात मराठी राहिली तर साहित्यात ही भाषा नक्कीच राहिल. माझ्या वडिलांनी १५ वर्षे मराठी मासिक चालवले. वडिलांच्या स्मृतीनिमित्त आणि मराठी भाषा व्यवहारात राहावी या भावनेने या सभागृह आणि अभ्यासिकेला देणगी दिली आहे. प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, नाट्य परिषद आणि साहित्य परिषद यांनी खरोखरीच एकत्र येऊन काम करायला हवे. साहित्य संस्थांनीही कालानुरूप बदलणे गरजेचे आहे. साहित्य परिषदेची वास्तू दिमाखदार आणि आधुनिक सुखसोयींनी युक्त व्हावी असे साहित्यिकांचे आणि साहित्य रसिकांचे अनके दशकांचे स्वप्न होते. सूत्रसंचालन वि. दा. पिंगळे यांनी केले. प्रास्ताविक सुनीताराजे पवार यांनी केले. ॲड. प्रमोद आडकर यांनी आभार मानले.

### प्रशांत दामले यांना दाद

» आपल्या बायकोला वाचता येणं ही सर्वात मोठी कादंबरी वाचण्यासारखे आहे. आपल्याला जमिनीवर आणायचे काम करते ती बायको. आपण कितीही वर गेलो तरी तिच आपल्याला जागेवर आणते. त्यामुळे नाटक फक्त बाहेरच करावं लागतं असे नाही तर घरातही करावं लागतं असे त्यांनी सांगितल्यावर सगळेच हसले.

# तुपकरांना 'स्वाभिमानी'चा अल्टिमेटम

## »15 ऑगस्टपर्यंत बाजू मांडा : जालिंदर पाटील

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मागच्या काही दिवसांपासून नाराज असलेल्या रविकांत तुपकर यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेने अल्टिमेटम दिला आहे. 15 ऑगस्टपर्यंत रविकांत तुपकर यांनी आपली बाजू मांडावी, अशा सुचना स्वाभिमानी संघटनेने रविकांत तुपकर यांना दिल्या आहेत. आज पुण्यात स्वाभिमानीच्या बैठकीनंतर राजू शेट्टी आणि संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेतली यावेळी ते बोलत होते.**



दरम्यान जालिंदर पाटील म्हणाले की, 15 ऑगस्टपर्यंत रविकांत तुपकर यांना समिती वेळ देत आहे. त्यांनी आपल म्हणणे समितीसमोर नोंदवावs म्हणजे समितीला निर्णय घेता येईल. तुपकर यांनी संघटनेसोबतच राहावे. 15 तारखेपर्यंत तुपकर आले नाहीत. तर समिती पुढचा निर्णय घेईल. राजू शेट्टी म्हणाले की, पक्षांची फोडाफोड करणे हा भाजपचा अधिकृत कार्यक्रमच झाला आहे.

राष्ट्रीय समाज पक्ष, शिवसंग्राम पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्याबाबत भाजपने हेच केले होते, असे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी म्हटले आहे. दरम्यान राजू शेट्टी पुढे बोलताना म्हणाले की, तुपकरांसंदर्भात ज्या अर्थी इतक्या झटपट प्रतिक्रिया येते ती ऐकून यामागे भाजप असावे, असा संशय घ्यायला जागा आहे.

### तुपकरांनी व्यक्त केली नाराजी

» काही दिवसांपूर्वी रविकांत तुपकर यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटने कार्यकर्त्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीतच पक्षातील मतभेद चव्हाट्यावर आले होते. या बैठकीत आपला केसाने गळा कापण्याचा प्रयत्न होत असल्याचे तुपकर म्हणाले होते. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांच्याकडून रविकांत तुपकर यांचे नेतृत्व दाबण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा नंतर सुरू झाली. याला खुद्द रविकांत तुपकर यांनीही दुजोरा दिला. त्यामुळे आता तुपकर स्वाभिमानीत राहणार की वेगळा पर्याय निवडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मोबाईल चोरी करणारी आंध्रची टोळी गजाआड

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

आंध्रप्रदेश, तेलंगणा येथून पुण्यात येऊन बसमध्ये गर्दीचा फायदा घेऊन मोबाईल चोरी करणाऱ्या टोळीला जेरबंद करण्यात बंडगार्डन पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी चार आरोपींना अटक करुन त्यांच्या ताब्यातून 2 लाख 10 हजार रुपये किंमतीचे 12 मोबाईल हस्तगत केल्याची माहिती दिली आहे.

सतीश व्यंकटेश माधगोलू, जगदीश भास्करराव आवला, विक्रम शिवनाथ दास (२२,रा. हैद्राबाद, तेलंगणा), गणेश कृष्णा गोड (२२,रा.बहारा, महासमुंद, छत्तीसगड) अशी याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे. याप्रकरणी बंडगार्डन पोलिसांकडे तक्रार दाखल केलेले तक्रारदार व त्यांचा चुलत भाऊ पाच ऑगस्ट रोजी घरी जाण्यासाठी अलंकार चौकाजवळील पीएमटी बसस्टॉपवरून केशवनगर येथे जाणाऱ्या बसमध्ये चढत होते. त्यावेळी चार अनोळखी व्यक्तींनी त्यांचे शर्टाचे खिशात ठेवलेला दहा हजार रुपये किंमतीचा मोबाईल फोन चोरुन नेला.

याबाबत बंडगार्डन पोलिस चौकशी करताना, पोलिस अंमलदार मनोज भोकरे व शिवाजी सरक यांना त्यांचे खबऱ्या मार्फत माहिती मिळाली की, पुणे एसटी स्टॅण्ड समोर मालधक्काकडे जाणाऱ्या रस्त्यावर असणाऱ्या अंडाभुर्जीच्या गाडीजवळ चार जण थांबले असून ते मोबाईल फोन विक्री करण्याबाबत विचारणा करत आहे.

# अग्निशमन व आपत्कालीन सेवा शुल्क

# नवीन धोरणाची अंमलबजावणी करा!

## माजी विरोधी पक्षनेता नाना काटे यांचे आयुक्तांना निवेदन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

### गृहनिर्माण संस्थांना फीच्या नावाखाली भुर्दंड नको



**पिंपरी चिंचवड महापालिकेने शहरातील बांधकामांना परवानगी देताना आकारण्यात येणाऱ्या अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी चे दर कमी करणेबाबत व नवीन महाराष्ट्र राज्य शासनाच्या आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक सुधारणा आदेशाची महापालिकेने अंबलबजावणी करावी अशी मागणी आयुक्तांना माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.**

निवेदनात काटे यांनी म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे शहरातील ४५ मीटर व ४५ मीटर पेक्षा जास्त उंचीच्या बांधकामांना परवानगी देताना वार्षिक आग सुरक्षा निधी म्हणून जी अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी आकारण्यात येतो. तो खूप असून यासाठी शहरातील बांधकाम व्यावसायिकांना व गृहरचना संस्थाना आर्थिक भुर्दंडाला सामोरे जावे लागत आहे. मुळात सध्य स्तिथीत आपल्या महापालिकेतर्फे आकारण्यात येणारी अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी हे राज्यातील ठाणे, पुणे, नाशिक यांच्यापेक्षा खूप जास्त असून यामध्ये मोठी तफावत आहे. यामध्ये सुधारणा करण्यासाठी काही गोष्टीचा विचार करून त्वरित सुधारणा करावी. या बाबतचे आदेश पारित करावा व यासंबंधी नुकताच राज्य शासनाने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक फी सुधारणा आदेश दि. ८ जून २०२३ रोजी पारित केला आहे. त्याची अध्याप अंबलबजावणी महापालिकेने देखील केलेली नाही. पालिकेने आकारण्यात येणाऱ्या फी संरचनेमध्ये सुधारणा करून राज्य शासनाचा आदेशाची अंबलबजावणी करावी. शहरातील बांधकाम व्यावसायिकांना व गृहरचना संस्थाना फीच्या नावाखाली वर्षाला बसणाऱ्या आर्थिक भुर्दंडातून मुक्तता करावी, अशी मागणी काटे यांनी निवेदनात दिले आहे.

### "शो-बाजी" नको : नाना काटे

प्रभाग क्र २८ रहाटणी, पिंपळे सौदागर मधील जगताप डेअरी ते शिवार चौक आणि स्वराज गार्डन चौक ते कोकणे चौक दरम्यान फुटपाथ विकसित करताना लावण्यात आलेली शो ची झाडे काढून त्याजागी १ ते २ फुटापर्यंत वाढणारी फुलांची आकर्षक झाडे लावण्यात यावी अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी केली आहे. रहाटणी पिंपळे सौदागर येथे जगताप डेअरी ते शिवार चौक, स्वराज गार्डन चौक ते कोकणे चौकापर्यंत महापालिकेतर्फे स्मार्ट सिटी व उद्यान विभागातर्फे फुटपाथ विकसित करताना रस्त्याचा दोन्ही बाजूला शोभेची झाडे लावण्यात आलेली आहेत. मुळात हि झाडे खूप अस्ताव्यस्त ८ ते १० फुटापर्यंत वाढलेली आहेत. यामुळे नागरिकांना फुटपाथ वरून चालताना, व सायकल चालविणाऱ्या नागरिकांना अडथळा ठरत आहेत. पावसामुळे झाडे मोठ्या प्रमाणत वाढल्याने याचा आधार घेत रात्रीच्या वेळी येथे अनुचित प्रकार घडत असतात. याबाबत नागरिकांच्या अनेक तक्रारी येत असून काही अनुचित प्रकार व दुर्घटना घडू नयेत. यासाठी फुटपाथ लगत विकसित करताना लावण्यात आलेली झाडे त्वरित काढून त्याजागी १ ते २ फुटांपर्यंत वाढणारी फुलांची व शोभेची आकर्षक झाडे लावण्यात यावी असे नाना काटे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# 'मेरी मिट्टी मेरा देश' अभियानाचे आयोजन!

## 9 ते 14 ऑगस्टपर्यंत नियोजनबद्ध पद्धतीने राबविले जाणार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।



**पिंपरी चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग घेऊन 'मेरी मिट्टी मेरा देश' हे अभियान उत्साही स्वरूपात नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात येणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी महापालिकेतील झालेल्या बैठकीत दिली. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमाच्या समारोपीय उपक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे 'मेरी मिट्टी मेरा देश' अभियान ९ ते १४ ऑगस्ट २०२३ पर्यंत राबविले जाणार आहे.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत 'मेरी मिट्टी मेरा देश' अर्थात मिट्टी को नमन, वीरों को वंदन हे अभियान संपूर्ण देशात राबविण्याच्या अनुषंगाने आज महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनामध्ये अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, शहर अभियंता मकरंद निकम, मेरी मिट्टी मेरा देश उपक्रमाचे पालिका समन्वयक तथा उप आयुक्त मिनीनाथ दंडवते, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित, अण्णा बोदडे, किरणकुमार मोरे, उमेश ढाकणे, शितल वाकडे, सीताराम बहुरे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक उद्यान अधिक्षक मंजुषा हिंगे आदी उपस्थित होते.आपल्या माती विषयी जनजागृती, प्रेम आणि साक्षरता निर्माण व्हावी व या मातृभूमीसाठी झटणारे तसेच त्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शुरविरांचा सन्मान व्हावा याकरिता मेरी मिट्टी मेरा देश अभियान राबविण्यात येत आहे. त्यामध्ये विविध उपक्रमांचा समावेश आहे. या उपक्रमांतर्गत शहरातील संस्मरणीय अशा एका ठिकाणी शिलाफलकाची उभारणी करणे, महानगरपालिका हद्दीतील प्रभागनिहाय एक किंवा दोन मूठ माती घेऊन त्यातून शहराचा कलश तयार करून तो सन्मानपूर्वक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्तरावरील समन्वयक अधिकारी यांच्याकडे सोपविणे असे विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

### आजी किंवा माजी सैनिकांचा सन्मान


महापालिका कार्यक्षेत्रातील ज्यांनी देशासाठी, स्वातंत्र्यासाठी आणि सुरक्षेसाठी बलिदान केले अशा सरंक्षण दल, निम संरक्षण दल, पोलीस दलातील शहिदांच्या व स्वातंत्र्य सैनिकांच्या परिवारातील सदस्यांचा तसेच आजी किंवा माजी सैनिकांचा सन्मान महापालिकेच्या वतीने करण्यात येणार आहे. शहरवासीयांनी प्रतिज्ञा घेण्याबाबत शासनामार्फत सूचना देण्यात आल्या आहेत तर महापालिकेच्या वतीने शहरातील योग्य अशा एका ठिकाणी कार्यक्रम घेऊन राष्ट्रगीत गायन व ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी दिली.

# अध्यापकांना आणि विद्यार्थ्यांना आव्हान !




**शिक्षण- त्यातही विद्यार्थ्यांशी सतत संवाद साधत चालणारे शिक्षण ही आनंददायी प्रक्रिया असते असेच मला आज तीन दशकांहून अधिक काळ अध्यापन केल्यानंतरही वाटते. अशा संवादातून एकमेकांचे पटत नसले तरी निरनिराळे दृष्टिकोन कळतात, ऐकण्याची क्षमता वाढते आणि मानसिक- बौद्धिक क्षितिजे नक्की विस्तारतात!**

या संवादात 'वाद' होऊही शकतात... माझे काही डाव्या विचारांचे विद्यार्थी मला गांधीवादी ठरवायचे, दलित विद्यार्थी मला तोंडावर ऐकवायचे की मी उच्चवर्णीय नसतो तरच मला वंचितांची दु:खे कळली असती.. आणि मी थिओडोर अडोर्नो किंवा एरिक फ्रॉम यांची पुस्तके वाचतो म्हणून मला 'नवा डावा' ठरवणारेही बरेच होते! पण मी वेळीच निवृत्त झालो हेच बरे झाले की काय असे मला काही वेळा वाटू लागते, त्यापैकी एक कारण अलीकडेच कानांवर आलेला महाराष्ट्र राज्यातला- विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाणाऱ्या पुणे शहरातला एक प्रसंग. बारावी इयत्तेच्या विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या त्या शिक्षकावर गुन्हा दाखल झाला आणि या तरुण शिक्षकाला अटकही झाली. मी अध्यापन करत असताना या अशा तथाकथित 'राष्ट्रवादी' किंवा धर्माधिष्ठित भावना इतक्या तीव्र नव्हत्या, असे पुण्याच्या त्या प्रसंगाबद्दल ऐकल्यानंतर



लक्षात येते. त्या वेळी गुपचूप ध्वनिचित्रमुद्रण करणारे विद्यार्थी नव्हते, तसे व्हीडिओ 'व्हायरल' होत नव्हते आणि वर्गात जे काही बोलले जाते त्याबद्दल गुन्हा दाखल होणे वा अटक याची तर कल्पनाही कोणी केलेली नव्हती. वर्गातील विद्यार्थी आणि अध्यापक यांचा एकमेकांवर काहीएक विश्वास होता, त्यामुळे वर्ग ही अध्यापकावर पाळत ठेवण्याची जागा नव्हती. याउलट पुण्यात काय झाले पाहा. 'सिम्बायॉसिस कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स' या तेथील महाविद्यालयातील अध्यापकाला डेक्कन जिमखाना पोलिसांनी 'धार्मिक भावना दुखावल्या'बद्दल अटक केली. त्यानंतर महाविद्यालयानेही हिंदू देवदेवतांबद्दल भर वर्गात 'आक्षेपार्ह' शेरेबाजी केल्याप्रकरणी त्याच्यावर निलंबनाची कारवाई केली. हे अध्यापक (माझ्यापेक्षा वयाने बरेच लहान म्हणून मी त्यांना अरे-तुरे करतो आहे) अशोक सोपान इयत्ता बारावीच्या वर्गात हिंदी शिकवत असताना विद्यार्थ्यांशी बोलत होते. कथित ध्वनिचित्रमुद्रण एका विद्यार्थ्यानेच त्यांच्या नकळत केल्याचे दिसते. या व्हीडिओमध्ये अशोक हे विद्यार्थ्यांना 'ईश्वर एक आहे' ही संकल्पना समजवण्याचा प्रयत्न करत आहेत आणि त्यासाठी इस्लाम आणि ख्रिस्ती धर्मातील ईश्वर-संकल्पनेची उदाहरणे देत आहेत. पण त्यांना अखेर 'ईश्वर एक आहे' हेच सांगायचे आहे, इतपत स्पष्टता 'व्हायरल' झालेल्या त्या व्हीडिओत आहे. मात्र हे झाल्यावर कुणा लढाऊ हिंदू संघटनेने फार वेळ न दवडता पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली. पुणे पोलिसांनीही या शिक्षकावर भारतीय दंड विधानाच्या कलम '२९५ अ' नुसार ("कोणत्याही वर्गाच्या धर्माच्या किंवा धार्मिक श्रदधांचा अपमान करून धार्मिक भावनांवर अत्याचार करण्याच्या उद्देशाने बुद्धिपुरस्सर व दुष्ट उद्देशाने कृती करणे" असे या कलमातील शब्द आहेत. इथे 'कोणत्याही वर्गाच्या' या शब्दप्रयोगातील 'वर्ग' हा शाळा-महाविद्यालयातील नसून समाजगट अशा अर्थाने आहे. या घडामोडीमुळे एक अध्यापक म्हणून मी व्यथित झालो, वैतागलोसुद्धा. शिकण्याची प्रक्रिया ही काही घेण्याची- काही सोडून देण्याची असते, त्यादरम्यान अनेक प्रश्न आणि प्रति-प्रश्न उपस्थित केले जातात आणि वादातूनही संवादच वाढवायचा आहे याची जाणीव संभाषणातून काही शिकण्यासाठी असावी लागते. पण आपण आता हे असे व्हीडिओ व्हायरल करून शिकण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचे काम करणाऱ्या परस्परविश्वासालाच नाकारत आहोत... आणि यातून आपण 'विद्यार्थीवृत्ती'सुद्धा नष्ट करत आहोत. माझी खात्री आहे की, 'सिम्बायॉसिस कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स'मधले बारावीच्या वर्गातले विद्यार्थी नवतरुणच असतील, ज्यांनी आता कोठे जग पाहायला सुरुवात केली आहे अशा वयातच हे सारेजण असतील. पण उलट याच वयात तर त्यांनी डोळे-कान उघडे ठेवून, समोरचा असे का बोलतो/ वागतो आहे याबद्दल कुतूहल बाळगले पाहिजे, अशाच प्रकारच्या कुतूहलातूनच त्यांनी उत्तमोत्तम पुस्तके वाचली पाहिजेत, आपापल्या जाती/धर्मांवर आधारित अस्मितांच्या पलीकडले जग कसे आहे हे पाहाण्याचा प्रयत्न करून संस्कृती, समाज यांच्याबद्दल चहुअंगांनी सजग होऊन आपले क्षितिज वाढवले पाहिजे. हीच तर 'विद्यार्थी' असण्यातली गंमत आहे.

## संपादकीय »

### 'इंटरेस्टिंग' की..?

***एखाद्या राज्यातील न्यायालयांबाबत सर्वोच्च न्यायालयास अशी काही टिप्पणी करावी असे वाटत असेल तर ते निश्चितच गंभीर ठरते.***

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर दोन दिवसांनी का असेना, पण लोकसभा सचिवालयाने राहुल गांधी यांचे सदस्यत्व पुनस्थापित केले ते योग्य झाले. त्यामुळे परत त्यासाठीची कज्जेदलाली टळली. राहुल गांधी यांना 'मोदी' बदनामीप्रकरणी दोन वर्षांची शिक्षा जाहीर झाल्या झाल्या त्यांचे सदस्यत्व रद्द करण्याचा, त्यापाठोपाठ त्यांचा बंगला काढून घेण्याचा प्रशासकीय झपाटा लोकसभा सचिवालयाने दाखवला तितकी गती या उलट प्रक्रियेत नव्हती, हे मान्य. तसे होणेही साहजिक म्हणायचे. सद्य:स्थितीत सर्वोच्च सत्ताधिकाऱ्यास न दुखावण्याचा कल सगळीकडेच दिसून येत असेल तर एखादे खाते त्यास अपवाद ठरेल असे मानणे हा भाबडा आशावाद झाला. जे झाले त्यामुळे खरे तर राहुल गांधी यांची राजकीय उंची वाढण्यास मदत झाली. हे साध्य करण्यासाठी राहुल गांधी आणि त्यांच्या काँग्रेस पक्षास प्रदीर्घ काळ जितके कष्ट करावे लागले.

**जम्मू-काश्मीर आता दहशतवादापासून मुक्त आहे, भ्रष्टाचारापासून मुक्त आहेच आणि प्रशासकीय मांद्यापासूनही अगदी मुक्त आहे. अवघ्या एक कोटी ३५ लाख लोकसंख्येसाठी पाच लाख सरकारी कर्मचारी, हे इथले प्रमाण हरियाणासारख्या भाजपशासित राज्यांपेक्षा नक्कीच अधिक आहे..**

# चारच वर्षांत काश्मीर बहरले!

हॉलीवूडपट दाखवणारे 'आयनॉक्स' थिएटर राज्याच्या राजधानीत उघडले आहे, जिल्हा मुख्यालयात नवीन चित्रपटगृह सुरू झाले आहे, राज्याच्या राजधानीतील बाजारपेठा रात्री उशिरापर्यंत खुल्या असल्याने लोक अगदी मध्यरात्रीपर्यंत सहज आइस्क्रीम खाण्यासाठी म्हणून हिंडू शकतात.. शहरे आणि शहरांमध्ये रस्त्यावर हिंसाचार होत नाही आणि सामान्य लोक मोकळेपणाने व्यक्त होतात, असे जर एखाद्या भारतीय राज्याच्या प्रमुखाने तुम्हाला सांगितले, तर तुम्ही काय म्हणाल? यात महान कामगिरी कसली.. हे सारे सामान्यच तर आहे, असेच तुम्हाला वाटेल- मात्र हेच सारे आता जम्मू व काश्मीर केंद्रशासित प्रदेशात घडते आहे! अनुच्छेद ३७० रद्द केल्यानंतर गेल्या चार वर्षांत प्रशासनाच्या नेत्रदीपक कामगिरीचा हा एक वानवळा आहे.



राज्यघटनेतील तो अनुच्छेद जम्मू-काश्मीरमध्ये अनेक दशकांपासून अराजकता निर्माण होण्याचे कारण होते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर दहशतीचे सावट असल्यामुळे या राज्याला लष्करावर अवलंबून राहावे लागले. येथील लोकशाही राज्ययंत्रणेच्या अधोगतीमुळे अनेकांचे हितसंबंध तेवढे बहरले. मात्र सर्वसामान्य नागरिकांना त्रासच सहन करावा लागला. अनुच्छेद ३७० रद्द केल्यानंतरच्या 'फेरउभारणी'ची तुलना दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनी आणि जपानच्या पुनर्रचनेशी होऊ शकते, असे या राज्यात महत्त्वाच्या पदांवर काम केलेल्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याचे मत आहे. मेईजी राजवटीतील जपान किंवा हिटलरच्या जर्मनीची विद्यमान लष्करी रचना मोडून काढणे आणि नवीन प्रशासकीय शासनाची निर्मिती हे आव्हान युद्धोत्तर जपानी आणि पश्चिम जर्मन नेतृत्वाने जसे पेलले, तसाच प्रयत्न जम्मू-काश्मीरमध्ये करावा लागला- सुसंस्कृत, आधुनिक राज्याची पायाभरणीच इथे करावी लागली.

अनुच्छेद ३७० रद्द केल्यावर इथले सारेच कायदे पुनर्लिखित करणे आवश्यक होते – ही प्रक्रिया राष्ट्रपती राजवटीत पूर्ण झाली. ३५० हून अधिक महत्त्वाच्या कायद्यांत सुधारणा करण्यात आल्या. परिणामी राज्याच्या प्रशासनाचे राज्यघटनेशी संपूर्ण, सुस्पष्ट एकीकरण झाले. याचाच अत्यंत महत्त्वाचा परिणाम म्हणजे, ३७० लागू असतानाची स्थिती यापुढे कधीही- कदापिही परत येऊच शकत नाही! नवीन प्रशासकीय संरचनांनी केंद्रशासित प्रदेशात कायद्याचे राज्य परत आणले आहे. नायब राज्यपाल मनोज सिन्हा म्हणतात त्याप्रमाणे, इथली शांतता कुणाकडून उसनी घेतली नसून; ती कायद्याद्वारे दृढपणे स्थापित केली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



परपुरुषाचें सुख भोगे तरी ।
उतरोनि करीं घ्यावें सीस ॥१॥

संवसारा आगी आपुलेनि हातें ।
लावूनि मागुतें पाहूं नये ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# जालना जिल्ह्यात बसचा अपघात

## ओव्हरटेकच्या नादात 50 फूट खड्ड्यात कोसळली

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**जालना जिल्ह्यात एसटी बसचा अपघात झाला आहे. पुसद येथून मुंबईकडे जाणाऱ्या बसचा जालना जिल्ह्यातील मंठा ते वाटरच्या दरम्यान हा अपघात झाला आहे. बसमध्ये एकूण 42 प्रवासी होते. तर त्यातील 8 प्रवाशी गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. ओव्हरटेक करण्याच्या नादात ही बस रस्त्याच्या कडेला असलेल्या सुमारे 50 फूट खोल खड्डुयात ही बस कोसळली.**



माहिती मिळताच पोलिस आणि स्थानिकांनी धाव घेतली होती ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात हा अपघात घडल्याची माहिती मिळत आहे. एसटी बस ओव्हरटेक करत असताना 50 फूट खाली खड्डुयात कोसळली आहे. या अपघातात काही प्रवाशी जखमी झाले आहेत. अपघातानंतर तातडीने स्थानिक नागरीक मदतीसाठी धावले. तसेच पोलीस आणि बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले.

मंठा शहराच्या पुढे किलडी फाटा असून त्याठिकाणी एका पुलाचे काम नुकतेच झाले. या दरम्यान रस्त्यावर मोठा ट्रक उभा होता.

या ट्रकला ओव्हरटेक करत असताना बस खाली खड्डुयात कोसळली, अशी माहिती बसच्या कंडक्टरने घटनास्थळावरील लोकांना दिली. बसमध्ये असलेल्या प्रवाशांमध्ये वृद्धांचा देखील समावेश होता. या अपघातात नेमके किती प्रवासी जखमी झाले आहेत, याबाबत सविस्तर माहिती समजू शकलेली नाही. पण घटनास्थळी अनेक रुग्णवाहिका दाखल झाल्या आहेत. या रुग्णवाहिकांच्या माध्यमातून प्रवाशांना जवळील रुग्णालयात उपचारासाठी नेले जात आहे. संबंधित घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे

### 8 प्रवाशी गंभीर जखमी

» प्रवाशांना तातडीने मंठा येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे, अशी माहिती विभाग नियंत्रक प्रमोद नेहूळ यांनी काही माध्यमांशी बोलताना दिली आहे. तर सुमारे 8 प्रवाशी जखमी असल्याचे त्यांनी सांगितले.

# महिलांचा सन्मान करणे शिकावे!

## मलाही 14 दिवस जेलमध्ये डांबले : राणा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**संसदेत अविश्वास प्रस्तावाच्या चर्चासत्रात अमरावतीच्या अपक्ष खासदार नवनीन राणा यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला. त्या म्हणाल्या की, अविश्वास प्रस्तावाला मी विरोध करत आहे. हा प्रस्ताव यासाठी होता की, महिलांवरील झालेल्या अत्याचारावर चर्चा व्हायला पाहिजे. परंतू दुपारी बारा वाजेपासून विरोधक केवळ मोदींना टारगेट करत आहे. त्यांना महिलांच्या समस्यांवर चर्चाच करायची नाही. केवळ पंतप्रधान मोदींना टारगेट करण्याचा त्यांचा उद्देश आहे.**



### महिला एसटी कर्मचाऱ्यांवर अन्याय

» महाराष्ट्रात देखील आपला लढा देण्यासाठी एसटी महामंडळाच्या महिला कर्मचारी रस्त्यावर आल्या. तर त्यांच्यावर अन्याय केला गेला. त्यांना महिनाभर जेलमध्ये टाकले गेले. त्यांना अडकवून त्रास दिला गेला. त्या महिला अन्यायावर हे विरोधक का बोलत नाही. केवळ मणिपूरचा विषय पुढे करून मोदींना टारगेट करण्याचे काम हे लोक करू पाहत आहेत.

नवनीत राणा पुढे बोलताना म्हणाल्या की, मणिपूरमधील महिला अत्याचाराची घटना अतिशय वाईट आहे. पण ही घटना 4 मे रोजी असल्याचे समोर आले. त्याचवेळी विरोधकांची टीम त्याठिकाणी का गेली नाही. पण त्यांना महिला अत्याचाराचा मुद्दा पुढे करून केवळ बदनामी करायची आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशन सुरू होण्याच्या आधल्या दिवशी हा व्हिडओ व्हायरल होतो. त्यानंतर संसदेचे कामकाज सुरू झाल्यावर विरोधक मणिपूरमध्ये जातात. यांना केवळ फोटो सेशन करायचे होते. रडणाऱ्या आईचा व्हिडिओ शूट करून लोकांना दाखवायचा होता. त्यामुळे माझी मागणी आहे की, यामागे हेतूपुरक काम करणाऱ्या लोकांवर कारवाई करावी, असे म्हणत राणा यांनी विरोधकांना टोला लगावला. नवनीत राणा म्हणाल्या की, मी देखील एक महिला आहे.

मणिपूरमधील महिला अत्याचाराची घटना वाईट आहेच. पण विरोधक केवळ राजकारण करू पाहत आहे. धक्कादायक बाब म्हणज राजस्थानमधील गेल्याच आठवड्यात एका नाबालिग मुलीवर अत्याचार झाला. तिला जीवंत जाळले गेले, त्यावर हे विरोधक गप्प का बसले आहेत. त्या अत्याचाराच्या घटनेचा त्यांनी साधा उल्लेख देखील केला नाही. यातून सिद्ध होते की, यांना महिलांच्या नावाखाली राजकारण करायचे आहे.

हनुमान चालिसाची घोषणा केली तर मला घरातून फरपटत नेत 14 दिवस जेलमध्ये टाकले गेले. पण येथे मोदींचे सरकार आहे. हनुमान चालिसा म्हटली म्हणून कोणावरही अन्याय होणार नाही. असे नवनीन राणा म्हणाल्या. तर महाराष्ट्रातील माझे सहकारी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी या ठिकाणी योग्य प्रश्न उपस्थित केला असल्याचे सांगून त्यांनी त्यांची बाजू देखील मांडली. खासदार नवनीत राणा म्हणाल्या की, मणिपूर महिला अत्याचाराची घटना पुढे करून केवळ राजकारण करू नका. विरोधकांनी महिलांचा सन्मान देखील केला पाहिजे. त्याची शिवकण त्यांनी घेण्याची गरज असल्याचा टोला देखील राणांनी लगावला.

# खड्डुयांमध्ये लावली चक्क भात रोपे

। कराड ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

चिपळूण रस्त्याच्या नित्कृष्ट दर्जाच्या कामाबाबत मंगळवारी पाटण तालुक्यातील संगमनगर ( धक्का ) येथे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या वतीने रास्ता रोको करत निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी कराड-चिपळूण रस्त्यावरील खड्डुयांमध्ये भात रोपे लावून शासनाचा निषेध नोंदवला.

यावेळी पाटण तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला अध्यक्षा सौ. स्नेहल जाधव, माजी प. सं.सदस्य बबनराव कांबळे, बाळासाहेब कदम, सत्यजित शेलार, पंकज गुरव, संपत जाधव, अश्फाक शेख, सुरज पंधारे, कोयना विभागातील पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी पं.स.सदस्य बबन कांबळे म्हणाले, कराड - चिपळूण रस्त्याचे काम अत्यंत नित्कृष्ट दर्जाचे झाले असून या रस्त्यावर शेकडो खड्डे पडलेले आहेत. या पडलेल्या खड्डुयांमुळे वाहतूक करताना नागरिकांना नाहक त्रास होत आहे. पावसामुळे या खड्डुयांची आणखीनच दुरावस्था झाली असून या खड्डुयांमध्ये पावसाचे पाणी साचले की वाहनचालकांना या खड्डुयांचा अंदाज येत नसल्याने गेल्या काही दिवसांत अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. या अपघातांमुळे आतापर्यंत अनेक जण जखमी झाले आहेत तर काही मृत्यू पावले आहेत. यापुढेही अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागू शकतो. खराब रस्त्यांमुळे वाहनांचा देखभाल खर्च देखील वाढत आहे.

प्रशासनाकडे या समस्येबाबत वेळोवेळी निवेदन देऊन तसेच तक्रार करुनही कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना केल्या जात नसल्याने हे आंदोलन करण्यात येत आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आता तरी याची दखल घेऊन लवकरात लवकर या रस्त्यावरील खड्डे प्रशासनाच्या वतीने भरले जावेत अशी आंदोलनाच्या माध्यमातून आम्ही मागणी केट आहोत. या रस्त्याच्या कामासाठी कोट्यावधींचा निधी खर्च करण्यात आला आहे. परंतु या रस्त्याचे काम अतिशय नित्कृष्ट दर्जाचे झाले असून सर्वसामान्यांचा हा पैसा कोणाच्या खिशात गेला आहे याची चौकशी झाली पाहिजे.

# राहुल गांधींची भारत जोडो यात्रा

## » पश्चिम-पूर्व असा असेल मार्ग, गुजरातहून मेघालयला

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**काँग्रेस नेते राहुल गांधी पुन्हा एकदा भारत जोडो यात्रेवर निघणार आहेत. त्यांचीही भारत जोडो-भाग 2 ही यात्रा गुजरात ते मेघालय अशी असणार आहे. राहुल यांची पहिली भारत जोडो यात्रा दक्षिण ते उत्तर अशी होती. आता दुसरी भारत जोडो यात्रा पश्चिमेकडून पूर्वेकडे असेल. हा प्रवास कधी सुरू होणार हे सध्या तरी जाहीर करण्यात आलेले नाही.**



महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी याविषयी माहिती दिली आहे. ते म्हणाले की, राहुल गांधींच्या पहिल्या भारत जोडो यात्रेला चांगला प्रतिसाद मिळाला होता, त्यामुळे आता दुसरी भारत जोडो यात्रा काढण्याची तयारी सुरू झाली आहे. ते ज्या वेळी भारत जोडो यात्रा काढतील त्याच वेळी महाराष्ट्र काँग्रेसचे नेते त्यांच्या राज्यातही अशीच यात्रा काढतील, असे नाना पटोले म्हणाले. नाना पटोले यांच्या वक्तव्यावर भाजपचीही प्रतिक्रिया आली आहे. महाराष्ट्र भाजपचे उपाध्यक्ष माधव भंडारी म्हणाले की, राहुल यांचा भारत जोडो दौरा अयशस्वी ठरला कारण त्यानंतर अनेक काँग्रेस नेत्यांनी पक्ष सोडला. राहुल गांधींनी पहिली भारत जोडो यात्रा 7 सप्टेंबर 2022 रोजी कन्याकुमारी येथून सुरू केली. तेव्हा 12 राज्यांमधून ही यात्रा जम्मू-काश्मीरमध्ये पोहोचली. यादरम्यान राहुल गांधींनी 4 हजार किलोमीटरचा पायी प्रवास केला होता. राहुल गांधींना 136 दिवस लागले. यादरम्यान राहुल गांधी तमिळनाडू, कर्नाटक, तेलंगणा, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, दिल्ली, यूपी, पंजाबमधून गेले. राहुल गांधी यांचे लोकसभा सदस्यत्व या आठवड्यात बहाल करण्यात आले आहे. सुरत कोर्टाने मानहानीच्या एका प्रकरणात राहुल गांधींना दोषी ठरवत 2 वर्षांची शिक्षा सुनावली होती. या निर्णयानंतर लोकसभा सचिवालयाने राहुल गांधी यांचे संसदेचे सदस्यत्व रद्द केले.

राहुल गांधी 13 एप्रिल 2019 रोजी कर्नाटकातील कोलार येथे एका निवडणूक सभेत म्हणाले होते, 'नीरव मोदी, ललित मोदी, नरेंद्र मोदी यांचे आडनाव सामान्य का आहे? सगळ्या चोरांचे आडनाव मोदी का? राहुल यांच्या या विधानाबाबत भाजपचे आमदार आणि माजी मंत्री पूर्णेश मोदी यांनी त्यांच्यावर कलम 499, 500 अंतर्गत फौजदारी मानहानीचा खटला दाखल केला होता. यानंतर राहुल यांचे सदस्यत्व गेले.

### सर्वोच्च न्यायालयाने शिक्षेला स्थगिती दिली

» खासदार झाल्यानंतर राहुल गांधी यांनी शिक्षेला स्थगिती मिळावी यासाठी गुजरात उच्च न्यायालयात धाव घेतली, मात्र त्यांना कोणताही दिलासा मिळाला नाही. त्यानंतर ते सर्वोच्च न्यायालयात पोहोचले, जिथे शिक्षेला स्थगिती देण्यात आली. यानंतर राहुल गांधी यांचे सदस्यत्व बहाल करण्यात आले आणि ते पुन्हा वायनाडचे खासदार झाले.

# अविश्वास प्रस्तावावर लोकसभेत चर्चा सुरू

## » मध्य प्रदेशातील महिला अत्याचारांवरही बोलावे : डिंपल यादव

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मणिपूर हिंसाचारावर केंद्र सरकारविरोधातील अविश्वास प्रस्तावावरील चर्चेदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळेंनी तडाखेबंद भाषण करत केंद्र सरकारला चांगलेच धारेवर धरले. केंद्र सरकारने 9 वर्षांत 9 राज्य सरकारे पाडल्याची टीका त्यांनी केली. तर शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी संसदेत हनुमान चालिसा पठण केले.**

मणिपूर हिंसाचारावर केंद्र सरकारविरोधातील अविश्वास प्रस्तावावर आज दुपारी 12 वाजेपासून लोकसभेत चर्चा सुरू झाली. अध्यक्ष ओम बिर्ला आपल्या जागेवर बसताच गदारोळ सुरू झाला. भाजप खासदार म्हणाले- सकाळी महासचिवांना पत्र आले होते की राहुल गांधी बोलतील. आम्ही त्यांच्या भाषणाची वाट पाहत आहोत. आता गौरव गोगोई बोलत आहेत. 5 मिनिटात काय झाले? तत्पूर्वी, लोकसभेचे कामकाज सकाळी 11 वाजता सुरू होताच ते दुपारी 12 वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले होते.

निशिकांत दुबे हे सरकारच्या वतीने उत्तर देणारे पहिले सदस्य असतील. राहुल यांची खासदारकी एक दिवस अगोदर 7 ऑगस्टलाच बहाल करण्यात आली आहे. चर्चेच्या शेवटच्या दिवशी 10 ऑगस्टला पंतप्रधान नरेंद्र मोदी उत्तर देऊ शकतात. मणिपूर हिंसाचार तसेच इतर मुद्द्यांवर पंतप्रधान बोलू शकतात.

**स्पीकर :** एका महत्त्वाच्या विषयावर चर्चा करत आहोत. सभागृहाच्या प्रतिष्ठेनुसार आणि अधिवेशनानुसार बोला. गांभीर्याने चर्चा करणे चांगले आहे.गौरव गोगोई: सर्वप्रथम मी आभार व्यक्त करतो. या अविश्वास प्रस्तावाच्या



समर्थनार्थ सर्व कोण उभे आहेत असे तुम्ही विचारले असता, मी INDIA आघाडीच्या सदस्यांचे आभार मानतो. हा अविश्वास प्रस्ताव आमची मजबुरी आहे. हे कधीच संख्येबद्दल नव्हते. ही मणिपूरसाठी न्यायाची बाब होती.

**गौरव गोगोई :** मणिपूर, तिथले तरुण, मुली, शेतकरी, तिथले विद्यार्थी आज न्याय मागतात. मार्टिन ल्यूथर किंग यांनी म्हटले आहे की, कुठेही अन्याय झाला तर तो सर्वत्र न्यायासाठी धोका बनू शकतो. असे समजू नका की हे फक्त ईशान्येत घडत आहे, हे भारतात घडत आहे. जर मणिपूरमध्ये आग लागली तर तो विभाजित झाला, भारतात आग लागली, तर भारत विभाजित झाला. देशाचे प्रमुख असल्याने पंतप्रधानांनी सभागृहात यावे, आपले म्हणणे मांडावे. सर्व पक्षांनी पाठिंबा द्यावा, शोक व्यक्त केला पाहिजे आणि मणिपूरमध्ये आपण सर्व एकत्र आहोत हा संदेश देऊया.

दुर्दैवाने असे घडले नाही. लोकसभेत आणि राज्यसभेतही ते बोलणार नाही, असा पवित्रा त्यांनी घेतला. त्यामुळेच मजबुरीने अविश्वास प्रस्ताव आणला.

### तरीही विरोधकांचे हत्यार का?

1963 मध्ये, प्रजा सोशलिस्ट पार्टीचे नेते जेबी कृपलानी यांनी लोकसभेत पहिला अविश्वास प्रस्ताव मांडला. पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे सरकार मतदानात बहुमत मिळवण्यात यशस्वी झाले असले तरी हा अविश्वास प्रस्ताव मांडताना आचार्य कृपलानी म्हणाले होते की, 'माझ्यासाठी ही अत्यंत दुःखाची बाब आहे की, अशा सरकारविरोधात मला प्रस्ताव आणावा लागला, ज्यामध्ये माझे 30 वर्षांचे अनेक मित्र सामील आहेत. असे असतानाही मी माझे कर्तव्य आणि सदसद्विवेकबुद्धीच्या जोरावर सरकारच्या जबाबदारीसाठी हा प्रस्ताव आणत आहे. त्यावर उत्तर देताना पंतप्रधान जवाहरलाल नेहरू म्हणाले होते, 'अशा प्रस्तावाद्वारे वेळोवेळी सरकारांची परीक्षा घेणे चांगले आहे. विशेषतः सरकार पडण्याची शक्यता नसतानाही.

लोकसभेत सरकारकडे बहुमत आहे की नाही, हे तपासण्यासाठी अविश्वास प्रस्तावाचा नियम करण्यात आला आहे. कोणत्याही सरकारविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणता येतो. ते पारित करण्यासाठी, लोकसभेत उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या एकूण खासदारांपैकी 50% पेक्षा जास्त मतदान आवश्यक आहे. लोकसभा ही देशातील जनतेचे प्रतिनिधित्व करते. जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी येथे बसतात, त्यामुळे सरकारला या सभागृहाचा विश्वास असणे आवश्यक आहे. या सभागृहात बहुमत असेल तरच सरकारला सत्तेवर राहण्याचा अधिकार आहे. संसदेच्या नोंदीनुसार, 2019 नंतर पंतप्रधान मोदींनी लोकसभेच्या कार्यकाळात एकूण 7 वेळा चर्चेत भाग घेतला आहे.

# आमिर खानची लेक अडकणार लग्न बंधनात



बॉलिवूड अभिनेता आमिर खान हा बॉलीवूडचा परफेक्शनिस्ट आहे. मात्र तो जितका चर्चेत असतो तितकीच त्याची लाडकी लेक मुलगी इरा खान ही देखील चर्चेत असते. इरा खान ही नेहमीच तिच्या वैयक्तिक कारणामुळे चर्चेत येणारी सेलिब्रेटी आहे. इरा सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. आयरा तिच्या वैयक्तिक आयुष्यातील फोटो चाहत्यांसोबत शेअर करत असते. इरा नेहमी लाइम लाइटमध्ये राहायला आवडते. बराच काळ एकमेकांना डेट केल्यानंतर आमिरची लाडकी मुलगी इराने 18 नोव्हेंबर रोजी तिचा बॉयफ्रेंड नुपूर शिखरेसोबत साखरपुडा केला. यावेळी आमिरची पुर्ण फॅमिलीही त्या कार्यक्रमात आली होती. दोघांच्या साखरपुड्याचे फोटो देखील सोशल मिडियावर व्हायरल झाले होते. इरा आणि नुपूर च्या एंगेजमेंटनंतर दोघांचे चाहते त्याच्या लग्नाची वाट पाहत होते. तिच्या चाहत्यांनीही तिला बऱ्याचदा लग्नाबाबत प्रश्न विचारले होते. आता इराने तिच्या लग्नाबाबत चाहत्यांना अपडेट दिली आहे. 26 वर्षीय इराने ती कोणत्या तारखेला लग्न करणार आहे हे पहिलेच ठरवल्याचं ETIMES ला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं आहे. त्याच बरोबर या खास तारखेलाच ती का लग्न करणार यामागचं कारणही तिने सांगितलं आहे. लग्नाबद्दल बोलतांना आयरानं सांगितलं की, ' त्यांना माहित आहे की ते 3 जानेवारीला लग्न करणार आहोत, पण आजपर्यंत त्यांनी कोणत्या वर्षी लग्न करणार हे ठरवलेल नाही. हिच तारीख का हे सांगतांना इरा म्हणाली की, 'ही तारीख आमच्यासाठी खास आहे कारण या दिवशी आम्ही पहिल्यांदा एकमेकांना किस केलं होतं.' इराचा बॉयफ्रेंड नुपूर हा एक फिटनेस ट्रेनर आहे. फिटनेस एक्स्पर्ट आणि कंन्सलटंट म्हणुन तो काम करतो. बऱ्याच वर्षांपासून तो आयराचा फिटनेस ट्रेनर म्हणून काम पाहत होता. त्याने केवळ आयराचं नव्हे तर सुष्मिता सेन आणि आमिर खानला देखील फिटनेसचे धडे दिले आहे. तर इरानं 2019 मध्ये दिग्दर्शनात पदार्पण केले.

# प्राजू स्वत:ला एवढं फिट ठेवते?

मराठी इंडस्ट्रीत दमदार व्यक्तिमत्व आणि लोकप्रिय कलाकार अशी प्राजक्ता माळीची ओळख आहे. आज प्राजक्ता माळीचा वाढदिवस. प्राजक्ता माळीने अनेक लोकप्रिय चित्रपटांमध्ये आणि मालिकांमध्ये तिच्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. अभिनेत्री प्राजक्ता माळी ही तिच्या अभिनयासाठी खास ओळखली जाते. तसेच तिचे मराठमोळ्या पोषाखातील लुक्ससुद्धा सोशल मीडियावर फार चर्चेत असतात. प्राजक्ताचा फिटनेस रूटीनदेखील सोशल मीडियावर चर्चेत असतो. ती अनेकदा चाहत्यांना फिटनेसच्या स्मार्ट टिप्स देत असते. चला तर आज आपण प्राजक्ताच्या फिटनेस, योगा आणि डाएटबाबत थोडक्यात जाणून घेऊया. 'प्राजक्ताने जुळून येती रेशीमगाठी' या मालिकेत काम केले होते, या मालिकेमुळे तिला खरी ओळख मिळाली होती. या मालिकेत तिने प्रमुख नायिकेची भूमिका पहिल्यांदाच साकारली होती. तिच्यासोबत अभिनेता ललित प्रभाकर हा प्रमुख नायकाच्या भूमिकेत होता. या मालिकेनंतर प्राजक्ताने तिच्या फिटनेसवर जास्त लक्ष केंद्रित केले. वजन कमी करण्याबरोबरच प्राजक्ताने तिचे डेली रूटीन ठरवून घेतले होते. फिटनेससाठी तिने डाएटविषयीची अनेक महत्वाची पुस्तके वाचली होती. ही पुस्तके वाचून ती योगासाठी प्रोत्साहित झाली होती. तिने व्यायामाची पारंपारिक शैली आत्मसात करण्यात सुरुवात केली. प्राजक्ता आहार आणि योगा दोन्ही गोष्टींना समान महत्व देते. एका मुलाखतीमध्ये बोलताना प्राजक्ताने सांगितले होते की, अष्टांग योगा केल्याने चेहऱ्याची स्किन, शरीर फिट ठेवणे, मनाला आणि शरीराला अंतर्बाह्य संतुलित करणे हे सगळं साध्य केलं जाऊ शकतं. अष्टांग योगा हा शरीरातल्या सगळ्या अवयवांना योग्य वळण देणारा एक चांगला व्यायामप्रकार आहे. प्राजक्ताने तिचे काही योगा व्हिडिओसुद्धा सोशल मीडियावर पोस्ट केले आहेत. प्राजक्ताच्या डाएटमध्ये सकस अन्नाचा समावेश आहे. व्यायामाबरोबरच आहार देखील तितकाच महत्वाचा आहे असं प्राजक्ता सांगते. व्यायाम आणि आहार व्यवस्थित असेल तर आरोग्य निरोगी राहते. तसेच आपली त्वचा आणि केसदेखील चांगले राहतात असे प्राजक्ता म्हणते. प्राजक्ता सकाळी उठल्यावर २-३ ग्लास गरम पाणी पिते. त्यानंतर ती एक फळ खाते. आणि त्यानंतर २ तासांनी भरपूर नाश्ता करते. तिच्या दुपारच्या जेवणामध्ये, एक ते दीड चपाती, हिरवी पालेभाजी, वरण किंवा कडधान्ये यांचा समावेश असतो. असा सकस आहार असलेले जेवण खायला तिला खूप आवडते. प्राजक्ताला चहा प्रचंड आवडतो. ती चहामध्ये साखरेऐवजी गूळ घालते. संध्याकाळचा चहा प्यायल्यानंतर प्राजक्ता साधारण ८-८.३० च्या दरम्यान जेवण करते.



# आलियाने तेलुगु शिकवले



आलिया भट्ट सध्या तिच्या हॉलिवूड डेब्यू चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात ती हॉलिवूड स्टार गल गडोत आणि जेमी डोर्नन यांच्यासोबत स्क्रीन शेअर करणार आहे. दरम्यान, आलियाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावरून समोर आला आहे, ज्यामध्ये ती गलला तेलुगु शिकवताना दिसत आहे. सोशल मीडियावर समोर आलेल्या या व्हिडिओमध्ये आलिया गल गडोत आणि जेमी डोर्ननसोबत दिसत आहे. यादरम्यान आलियाने तेलुगूमध्ये 'अंदारिकी नमस्कारम' आणि 'मीकू ना मुद्दुलु' ही ओळ बोलली. जी गल अगदी सहज बोलताना दिसत होती. हा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. हार्ट ऑफ स्टोन 11 ऑगस्ट रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होत आहे. हा चित्रपट टॉम हार्परने दिग्दर्शित केला आहे. या चित्रपटात सोफी ओकोनेडो, मॅथियास श्वेघोफर, झिंग लुसी आणि पॉल रीडी यांच्याही भूमिका आहेत.

# या इंडस्ट्रीची मी शेवटची मुघल!



भारतीय संगीत विश्वात आपल्या आवाजानं वेगळी छाप चाहत्यांच्या मनात उमटविणाऱ्या गायकांमध्ये आशा भोसले यांचे नाव घेतले जाते. गेल्या पाच दशकांहून अधिक काळ आशाजींनी भारतीय चाहत्यांना आगळा वेगळा सुरानंद दिला आहे. आता त्या त्यांच्या एका प्रतिक्रियेमुळे चर्चेत आल्या आहेत. ८९ वर्षे वय असणाऱ्या आशाजी यांचा उत्साह हा नेहमीच नवोदितांसाठी प्रेरणा देणारा ठरला आहे. त्या देखील त्यांच्या मनोगतातून वय हा माझ्यासाठी नेहमीच एक आकडा राहिला आहे. बाकी काही नाही. मात्र प्रत्येकवेळी आशाजींनी चाहत्यांना, नवीन कलाकारांना आणि इतर दिग्गज कलाकारांना मोठी शिकवण दिली आहे. कधीही कुणाची निंदा न करणे, नेहमी आपल्यापेक्षा मोठा कलाकाराचा मान ठेवणे, नवोदित कलाकारांचा उत्साह वाढवणे, त्यांना मार्गदर्शन करण्यात आशाजी अग्रेसर राहिल्या आहेत. वेगवेगळ्या रियॅलिटी शो मधून देखील आशाजी यांनी कलाकारांना मार्गदर्शन केले आहे. एवढेच नाहीतर लहान मुलांना देखील मोठ्या प्रेमानं त्यांनी समजावून सांगितले आहे. आता सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या त्या व्टिटनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. आशाजींना त्या ट्विटमधून नेमकं काय सांगायचे आहे असा प्रश्न नेटकऱ्यांना पडला आहे. आशाजी त्या ट्विटमध्ये म्हणतात की, मी बॉलीवूडमधील एकमेव अशी व्यक्ती आहे की, जिला बॉलीवूडचा सगळा इतिहास माहिती आहे. मी जर त्याविषयी सांगायला लागले तर मग तीन ते चार दिवस देखील मला अपूरे पडतील. मी काहीही विसरलेले नाही.

# भारताचा इंडीजवर विजय!

## सूर्यकुमार यादवची वादळी खेळी; सात विकेट्सने विजय

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील पाच टी२० मालिकेतील तिसरा सामना मंगळवारी (८ ऑगस्ट) संपन्न झाला. 'मिस्टर ३६०' अशी ओळख असणाऱ्या सूर्यकुमार यादवने वादळी खेळी केली. त्याच्या शानदार खेळीच्या जोरावर भारताने वेस्ट इंडीजवर सात विकेट्सने दणदणीत विजय मिळवला. सूर्यकुमार यादवने ४४ चेंडूत ८३ धावा करून बाद झाला आहे. त्याने आपल्या खेळीत १० चौकार आणि ४ षटकार मारले. भारताने या विजयासह मालिकेतील आव्हान कायम राखले आहे. मात्र तरीही वेस्ट इंडीज २-१ने आघाडीवर आहे.**





भारताने तिसऱ्या टी२० सामन्यात वेस्ट इंडिजचा सात विकेट राखून पराभव केला. या विजयासह भारतीय संघ पाच सामन्यांच्या मालिकेत कायम आहे. भारताच्या विजयानंतर मालिकेतील स्कोअर २-१ असा वेस्ट इंडिजच्या बाजूने आहे. या सामन्यात वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना १५९ धावा केल्या आणि भारताने तीन गडी गमावून लक्ष्य गाठले. सूर्यकुमार यादवला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. भारताने वेस्ट इंडिजवर सात विकेट्सने मात करत प्रथमच मालिका जिंकली. प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने पाच विकेट्सवर १५९ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताने १७.५ षटकांत तीन गडी गमावून १६४ धावा करून सामना जिंकला. वेस्ट इंडिजकडून ब्रेंडन किंगने ४२ आणि रोव्हमन पॉवेलने ४० धावा केल्या. त्याच वेळी, अल्झारी जोसेफने चेंडूसह दोन विकेट्स घेतले. त्याचवेळी भारताकडून प्रथम कुलदीप यादवने तीन विकेट्स घेतले, त्यानंतर सूर्यकुमार यादवने ८३ आणि तिलक वर्माने नाबाद ४९ धावा करत संघाला विजय मिळवून दिला. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील टीम इंडियासाठी हा करा किंवा मरोचा सामना आहे कारण वेस्ट इंडिजने पाच सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. पहिल्या टी२० मध्ये भारताचा ४ धावांनी आणि दुसऱ्या सामन्यात २ विकेटने पराभव झाला. अशा स्थितीत नुकत्याच झालेल्या पराभवात हार्दिक ब्रिगेड विजयाच्या मार्गावर परतली आहे. या विजयासह भारताने दमदार पुनरागमन केले असून, पाच सामन्यांच्या मालिकेत टीम इंडिया अद्याप कायम आहे. वेस्ट इंडिजने दोन आणि भारताने एक सामना जिंकला आहे. ही मालिका जिंकण्यासाठी भारताला उर्वरित दोन सामने जिंकावे लागतील. त्याचवेळी वेस्ट इंडिज संघाने दुसरा सामना जिंकताच मालिका जिंकली.

### दोन्ही संघांची प्लेईंग 11

भारत: शुबमन गिल, यशस्वी जैस्वाल, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, हार्दिक पंड्या (कर्णधार), संजू सॅमसन (यष्टीरक्षक), अक्षर पटेल, कुलदीप यादव, अर्शदीप सिंग, युजवेंद्र चहल, मुकेश कुमार.

वेस्ट इंडिज: ब्रेंडन किंग, काइल मेयर्स, जॉन्सन चार्ल्स, निकोलस पूरन (विकेटकीपर), रोव्हमन पॉवेल (कर्णधार), शिमरॉन हेटमायर, रोमॅरियो शेफर्ड, रोस्टन चेस, अकिल हुसेन, अल्झारी जोसेफ, ओबेद मॅककॉय.

# इंग्लंडने उपांत्यपूर्व फेरी गाठली

## जेम्स किमान एक सामना खेळू शकणार नाही

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**महिला फिफा विश्वचषक 2023 मध्ये सोमवारी इंग्लंड आणि नायजेरिया यांच्यात खेळल्या गेलेल्या प्री-क्वार्टर फायनल सामन्यात इंग्लंडची स्टार खेळाडू लॉरेन जेम्सला वाईट वर्तनासाठी रेड कार्ड दाखवण्यात आले. चीनविरुद्ध संघाच्या 6-1 अशा विजयात दोन गोल करणाऱ्या इंग्लंडच्या लॉरेन जेम्सला रेड कार्ड मिळाले, याचा अर्थ ही स्टार खेळाडू किमान एका सामन्याला मुकेल.**



### फुटबॉलमध्ये रेड कार्डचा अर्थ

पिवळे कार्ड देऊनही खेळाडूच्या वागण्यात सुधारणा न झाल्यास रेड कार्ड दिले जाते. रेड कार्ड म्हणजे खेळाडूला मैदानाबाहेर जावे लागते. एखाद्या खेळाडूला बाहेर काढल्यास त्याच्या जागी दुसरा खेळाडू येऊ शकत नाही. अशा प्रकारे खेळाडूंची संख्या कमी होतेरेड कार्ड मिळाल्यावर खेळाडूवर किमान एका सामन्याची बंदी घालण्यात येते. बाकी गुन्हा किती मोठा आहे, त्यावरही किती सामन्यांची बंदी घालण्यात येणार आहे. जर गुन्हा मोठा असेल तर खेळाडूची बंदी आणखी वाढवता येऊ शकते.

लॉरेनला सुरुवातीला सामन्याच्या 87व्या मिनिटाला नायजेरियाची बचावपटू मिशेल अलोजीवर फाऊल केल्यामुळे पिवळे कार्ड दाखवण्यात आले, परंतु VAR (व्हिडिओ असिस्टंट रेफरी) रिव्ह्यूनंतर रेफ्री मेलिसा बोर्जासने तिला रेड कार्ड दिले. रिप्लेने दाखवले की लॉरेनने मिशेलवर पाय ठेवून पुढे पाऊल टाकले. स्टार खेळाडू लॉरेन जेम्सच्या अनुपस्थितीत इंग्लंडने सोमवारी नायजेरियाचा पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत स्थान निश्चित केले. हा प्री क्वार्टर सामना पूर्ण वेळ आणि अतिरिक्त वेळेनंतर (120 मिनिटे) 0-0 असा बरोबरीत संपला.

नायजेरियाकडे अधिक चांगल्या संधी होत्या, परंतु ब्रिस्बेनमध्ये जवळपास 50,000 प्रेक्षकांसमोर झालेल्या शूटआऊटमध्ये 10 खेळाडूंसह खेळणाऱ्या इंग्लंडने 4-2 असा विजय मिळवला. सिडनी येथे शनिवारी होणाऱ्या उपांत्यपूर्व फेरीत इंग्लंडचा सामना कोलंबिया आणि जमैका यांच्यातील विजेत्याशी होईल.

# आलमचा पाकिस्तान क्रिकेटला अलविदा

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

पाकिस्तान क्रिकेट संघाचा आघाडीचा फलंदाज फवाद आलमने पाकिस्तान क्रिकेटला अलविदा केला आहे. फवादची आंतरराष्ट्रीय कारकीर्द 15 वर्षांची आहे. 37 वर्षीय फवाद आता यूएसएच्या लीग क्रिकेटमध्ये खेळताना दिसणार आहे. क्रिकबझच्या अहवालानुसार, तो USA च्या मायनर लीग क्रिकेट T20 स्पर्धेत शिकागो किंग्समन संघाकडून खेळणार आहे.

मात्र, अद्याप फवादच्या बाजूने कोणतेही वक्तव्य आलेले नाही. 2007 मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणारा फवाद पाकिस्तानच्या समी अस्लम, हम्माद आझम, सैफ बदर आणि मोहम्मद मोहसीन यांच्या क्लबमध्ये सामील झाला आहे. फवादच्या आधी हे खेळाडू अमेरिकेत खेळण्यासाठी आपला देश सोडून गेले आहेत. फवादने 2007 साली पाकिस्तानकडून टी-20 आणि एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. फवादने 2009 मध्ये कसोटी पदार्पण केले आणि त्याच सामन्यात शतक झळकावले. त्यानंतर पुढील दोन सामन्यांनंतर त्याला वगळण्यात आले आणि 11 वर्षांच्या कालावधीनंतर 2020 मध्ये तो कसोटी संघात परतला.

फवादने पाकिस्तानसाठी एकूण 19 कसोटी, 38 एकदिवसीय आणि 24 टी-20 आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. त्याच्या नावावर कसोटीच्या 30 डावांत 1011 धावा, एकदिवसीय सामन्याच्या 36 डावांत 966 धावा आणि टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या 17 डावांत 194 धावा आहेत. फवादने कसोटीत 5 आणि एकदिवसीय सामन्यात एक शतक झळकावले. याशिवाय त्याच्या नावावर 15 आंतरराष्ट्रीय विकेटही आहेत.